RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ७३] शुक्रवार, मे १५, २०२६/वैशाख २५, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २५२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मे, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.

क्रमांक जमीन २०२६/ प्र.क्र.३९/ जमीन-०१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ३३०-अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंदर्भात यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व अधिसूचना अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देशित करीत आहे की,

(अ) उक्त संहितेच्या कलम ३७-अ च्या पोट-कलम (१) आणि (२) अन्वये राज्य शासनाच्या मान्यतेचे अधिकार, संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून देखील वापरले जातील ;

(ब) कलम ३७-अ च्या पोट-कलम (१) आणि (२) अन्वये राज्य शासनाचे कार्योत्तर (post facto) मान्यतेचे अधिकार खालीलप्रमाणे वापरले जातील :—

(i) जेथे अशा अधिमूल्याची (premium) किंवा शुल्काची रक्कम आणि अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा दहा लाख रुपयांपर्यंत आहे, तेथे संबंधित जिल्हाधिकारी यांच्याद्वारे ; आणि

(ii) जेथे अशा अधिमूल्याची किंवा शुल्काची रक्कम आणि अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा दहा लाख रुपयांच्या वर आणि वीस लाख रुपयांपर्यंत आहे, तेथे संबंधित विभागीय आयुक्त यांच्याद्वारे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजय धारुरकर,
शासनाचे उप सचिव.

REVENUE AND FOREST DEPARTMENT

1st Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated the 15th May 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2026/C.R.39/J-1.— In exercise of the powers conferred by section 330A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and in supersession of all earlier notifications issued in this behalf, the Government of Maharashtra hereby directs that, —

(a) the powers of approval of the State Government under sub-sections (*1*) and (*2*) of section 37A of the said Code, shall also be exercised by the concerned District Collector ;

(b) the powers of post facto approval of the State Government under sub-sections (*1*) and (*2*) of section 37A shall also be exercised,-

(i) by the concerned District Collector, where the amount of such premium or charge and share of unearned income is upto rupees ten lakh; and

(ii) by the concerned Divisional Commissioner, where amount of such premium or charge and share of unearned income is above rupees ten lakh and upto rupees twenty lakh.

SANJAY DHARURKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.